**शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थामधील दुसरी व तिसरी पाळीतील कंत्राटी शिल्पनिदेशकांच्या नियमित करणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने मा. मंत्री, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करणेबाबत**

**महाराष्ट्र शासन**
**कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण- ३३१७/प्र.क्र.२१०/व्यशि-३**
दुसरा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : १२ जुलै, २०२३.

वाचा :- १) शासन निर्णय क्र. आयटीआय-२०१०/प्र.क्र.६४/व्यशि-३, दि.२३.०८.२०१०

**प्रस्तावना :-**

राज्यातील महानगरपालिका क्षेत्रातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये दुसरी व तिसरी पाळी आणि उर्वरित औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये दुसरी पाळी ऑगस्ट २०१० सत्रा पासून सुरू करण्यासाठी दुसऱ्या व तिसऱ्या पाळीत १२३९ व्यवसाय तुकड्यांसाठी आवश्यक असलेल्या १२३९ शिल्पनिदेशक, ५७ गटनिदेशक, २०४ गणित व चित्रकला निदेशक अशा कंत्राटी एकूण १५०० शिक्षकीय पदांच्या निर्मितीस (दरमहा रू. १५०००/- या ठोक मासिक वेतनावर) व त्यासाठी लागणाऱ्या एकूण रू. २४८०.९६ लक्ष इतक्या खर्चास विविध अटींस अधिन राहून दि. २३/०८/२०१० च्या शासन निर्णयान्वये मंजूरी देण्यात आलेली आहे.

२. तथापि, सदर कंत्राटी निदेशक संघर्ष समिती यांनी शासनाला दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने राज्यातील महानगरपालिका क्षेत्रातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये दुसरी व तिसरी पाळी साठी कंत्राटी तत्वावर घेण्यात आलेल्या शिल्पनिदेशकांचे शासन सेवेत नियमित करणेबाबत मागणीच्या अनुषंगाने मंत्रिमंडळाच्या दिनांक १६.०५.२०२३ रोजी झालेल्या बैठकीत पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात आलेला आहे.

१. शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थामधील कार्यरत कंत्राटी शिल्पनिदेशक यांच्याकडून वेळोवेळी शासन सेवेत नियमित करणेबाबत मागणी करण्यात येते, त्याअनुषंगाने मा. मंत्री, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करुन योग्य तो निर्णय घेण्यात यावा.

सदर मंत्रिमंडळाच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

**शासन निर्णय :-**

उपरोक्त प्रमाणे मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार -

शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थामधील कार्यरत कंत्राटी शिल्पनिदेशक यांच्याकडून वेळोवेळी शासन सेवेत नियमित करण्याबाबत केलेल्या मागणीच्या अनुषंगाने

मा. मंत्री, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता यांच्या अध्यक्षतेखाली पुढीलप्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे.

| अ.क्र. | समिती सदस्य | पद |
|---|---|---|
| १ | मा. मंत्री, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता | अध्यक्ष |
| २ | अपर मुख्य सचिव, वित्त विभाग | सदस्य |
| ३ | अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग | सदस्य |
| ४ | अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग | सदस्य |
| ५ | प्रधान सचिव, नियोजन विभाग | सदस्य |
| ६ | श्रीमती शोभाताई फडणवीस | तज्ञ सदस्य |
| ७ | सहसचिव/उपसचिव, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग | सदस्य |
| ८ | संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई | सदस्य सचिव |

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०२३०७१२१५४४१७७००३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

MITHUN MOHANRAO SALUNKHE

Digitally signed by MITHUN MOHANRAO SALUNKHE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SKILLS EMPLOYMENT ENTERPREUNERSHIP AND INNOVATION DEPARTMENT, 2.5.4.20=eb410b645758d07ea6303743e3a96f12f7b5ea5c78305aa3546f1b05a4d188d9, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=928224E8C07F06F0A63241EEC16360F9961117B3DFDA771ED6746D1433B5EA7A, cn=MITHUN MOHANRAO SALUNKHE
Date: 2023.07.12 15:46:12 +05'30'

**( मिथुन साळुंखे )**
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत ,**

१. मा. मंत्री, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, मंत्रालय, मुंबई
२. अपर मुख्य सचिव , कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, मंत्रालय,मुंबई
३. अमुस, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
४. अमुस, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
५. प्रधान सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
६. संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
७. सर्व विभागीय शिक्षण उप संचालक, (शालेय शिक्षण विभाग), (व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयामार्फत)
८. सहसंचालक,व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय,मुंबई/नाशिक/पुणे /औरंगाबाद/ अमरावती/नागपूर (व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयामार्फत)
१०. संबंधित जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, ( व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयामार्फत)
११. निवड नस्ती. (व्यशि-३).